## १०वी-१२वी नंतर करीअर निवडीकडे अधिक गांभीर्याने बघण्याची गरज...

करीअर म्हणजे आर्ट्स, सायन्स, कॉमर्स किंवा फार फार तर मेडिकल-इंजिनियरिंगमध्ये प्रवेश असाच समज आपल्याकडे प्रचलीत आहे. परंतु यापलीकडे जाऊन करीअर म्हणजे नेमकं काय? आपला नैसर्गिक कल-कुवत काय? आपली आवड काय? यावर आधारित आपल्याला कोणते पर्याय उपलब्ध आहेत? यशस्वी करीअर घडवण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरतात? यात शिक्षण, आपला दृष्टीकोन, आपल्यातील कौशल्ये आणि सवयी यांचा किती वाटा असतो? आपलं व्यक्तिमत्व आणि करीअर यांचा काय संबंध असतो? केवळ १०वी-१२वीच्या मार्कांच्या आधारावरच करीअरची दिशा न ठरवता व कशाला जास्त स्कोप आहे या मागे न जाता या प्रश्नांची उत्तरे डोळसपणे शोधली तर आपापल्या आवडीच करीअर तर निवडता व घडवता येईलच परंतु त्यासोबत आपल्याला अपेक्षित यश, पैसा, प्रसिद्धी, समाधान, आनंद हे सर्वही मिळेल.

मुळातच करीअर म्हणजे नेमकं काय हे सर्वप्रथम समजून घेण्याची गरज असते. व्यक्तीच्या जीवनातील ठराविक काळासाठी प्रगतीची संधी असणारा व्यवसाय म्हणजे करीअर या पुस्तकी व्याख्येसोबत त्यात अजून बऱ्याच गोष्टींचा समावेश होतो. करीअर संबंधी आपला स्वतःचा दृष्टीकोन काय आहे? त्यातून आपल्याला काय हवं आहे? हा विचार प्रत्येकाने केला तर करीअरची निवड करणं सोपं होईल. कोणतीही गोष्ट दोन प्रकारे केली जाऊ शकते. एक म्हणजे जेमतेम कसंतरी उरकणं आणि दुसरं म्हणजे सर्वोत्कृष्ट पद्धतीने करणं. मग ते एखादं काम असो, एखादं शिक्षण असो, तुमचं करीअर असो नाहीतर मग आपलं जीवन असो हे अशा दोन प्रकारे केलं जाऊ शकत. ज्या गोष्टीत आपली आवड आहे, आपला कल आहे ती गोष्ट साहजिकच आपण मन लावून करतो आणि म्हणून ती उत्कृष्टपणे केली जाते. जी गोष्ट मुळातच आपल्याला आवडत नाही ती आपण जेमतेम कशीतरी उरकतो, त्यात दर्जा नसतो, गुणवत्ता नसते आणि म्हणून त्याचे मूल्यपण कमी असते. ज्या गोष्टीचा आपल्या करीअरशी अत्यंत जवळचा संबंध असतो ती म्हणजे शिक्षण. किंबहुना आपल्या आयुष्यभर चालणाऱ्या करीअरच्या प्रवासातील पहिला टप्पा म्हणजे त्या-त्या क्षेत्रातील शिक्षण. गंमत बघा आपण आर्ट्स, सायन्स, कॉमर्स किंवा मेडिकल-इंजिनियरिंग यालाच करीअर समजतो, हो कि नाही? हे निवडणं म्हणजे करीअर निवडणं नव्हे , त्याने फक्त करीअरची दिशा निश्चित होईल. याचसाठी वेगवेगळ्या माध्यमांमधून आपल्याला यासंबंधीची माहिती मिळवणं गरजेचं आहे.

बरं शिक्षणक्रम तर निवडला पुढे काय? त्याने हवं तसं करीअर घडेल का? किंवा मुळातच त्याने करीअर निश्चित होईल का? तर अजिबात नाही! कोणताही शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर सुद्धा करीअरच्या असंख्य वाटा समोर दिसतात, त्यातली आपली वाट आपण निवडायची असते. प्रत्येक क्षेत्रात काही ठराविक करीअरच्या संधी असतात-उदाहरणार्थ प्रत्येक क्षेत्रातील शिक्षक, संशोधक, त्या-त्या क्षेत्रातील व्यवस्थापन, तंत्रज्ञान, मार्केटिंग, उद्योग, त्या विषयांतील उपयोजित करीअरच्या संधी. त्यातही सरकारी, निम सरकारी व खासगी क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्यातील करीअरच्या संधी. त्याचप्रमाणे त्या-त्या क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या व उद्योजकतेच्या संधी. बऱ्याचदा आपण स्वतः स्वतःचं अवलोकन, मूल्यमापन तटस्थपणे करणं शक्य नसतं अशावेळी इतरांची मदत घेणं फायद्याचं ठरत. आज विज्ञानाच्या विविध चाचण्यांमार्फत अशा प्रकारचे निर्णय घेण्याची सोय उपलब्ध आहे हि समाधानाचीच बाब आहे.

आज प्रत्येक क्षेत्रातील काही नामवंत व्यक्तींकडे बघितलं तर लक्षात येईल कि त्यांच्याही क्षेत्रात असंख्य लोकं होती, स्पर्धा होती परंतु ह्याच व्यक्ती कशा काय वेगळ्या उठून दिसतात? थोडक्यात काय तर यशस्वी झाल्यायत. याचं कारण काय? याचाही विचार आज करीअर निवडताना करायला हवा. केवळ शिक्षणाव्यतिरिक्त इतर काही घटकही आहेत ज्याने तुमच्या करीअरला वजन-वैशिष्ठ्य प्राप्त होते. कोणते आहेत हे घटक? संशोधनांती असे लक्षात आले आहे कि यशस्वी किंवा चांगलं करीअर घडवण्यामध्ये त्या क्षेत्रातील शिक्षणाचा वाटा फक्त १५ टक्केच असतो. उरलेला ८५ टक्के वाटा हा तुमचा स्वतःकडे, जगाकडे व एखाद्या परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टीकोन, तुमच्यातील विविध कौशल्ये आणि तुमच्या सवयी यांचा असतो. यातील १५ टक्क्यांवर आपण जीव तोडून मेहनत घेतो परंतु ८५ टक्क्यांचं काय? या ८५ टक्क्यांवर काम करणारी कोणतीच यंत्रणा आपल्याकडे आजमितीला तरी नाही आणि त्यासंबंधीची जाणीव किंवा जागरूकताही नाही.

करीअर करताना स्वतःकडे, जगाकडे व एखाद्या परिस्थितीकडे बघण्याचा समतोल, सकारात्मक दृष्टीकोन अंगी बनवण्यासाठी आपण काय करतो? करीअरसाठी आवश्यक विविध कौशल्ये आपण कुठे व कसे आत्मसात करतो? आपल्या कामात-करीअरमध्ये गुणवत्ता आणण्यासाठी कोणत्या चांगल्या सवयी बाणवण्याचा आपण प्रयत्न करतो? थोडक्यात काय तर फक्त १५ टक्क्यांवर काम करून व ८५ टक्क्यांकडे दुर्लक्ष्य करून त्यातून १०० टक्के परिणामांची मात्र अपेक्षा आपण करतो. इथेच आपल्याला माणूस म्हणून आपल्या पूर्ण क्षमतांचा वापर व जाणीव न झाल्याने अपयशाची कारण सापडतात. शारीरिक व बौद्धिक गुणवैशिष्ठ्यानी मिळून आपलं व्यक्तिमत्व बनतं. त्यात शिक्षण, तुमचा दृष्टीकोन, तुमच्या वृत्ती, विविध कौशल्ये आणि सवयी यांचा समावेश आलाच. आपण करणार असणाऱ्या करीअरच्या अनुषंगाने या गुणांचा जाणीव पूर्वक विकास करणंही शिक्षणा इतकंच महत्वाचं ठरत.

आज कित्येक नवनवीन करीअरर्स उदयाला येत आहेत. या आधीचीपण काही भुरळ घालणारी करीअरर्स आहेत. पण प्रश्न एकच आहे कि आपल्याला ती कितपत पेलवणारी आहेत? त्यासाठी स्वतःकडे डोळसपणे पाहण्याचा प्रयत्नही व्हायला हवा व तशी सवयही आपण करायला हवी.

निसर्गाने मानवाला बुद्धीचं व त्याबरोबर धडधाकट शरीराचंही वरदान दिलेलं आहे. आज ज्या युगात आपण जगतोय ते माहितीचं म्हणजेच संधीचं सुवर्णयुगच म्हणायला हवं. आपल्याला हवी ती माहिती थोड्याश्या प्रयत्नांनी लगेच उपलब्ध होते, तिचं आपण सोन करतो कि माती यावर खरं आपलं यशापयश अवलंबून आहे. म्हणूनच आपल्या आसपास अशी कित्येक उदाहरण दिसतात कि ज्यांनी अशक्यप्राय परिस्थितीतून सुद्धा यश प्राप्त केलं आहे. आपणही त्यांचा शोध घेतला पाहिजे, त्यांच्या पासून प्रेरणा घेतली पाहिजे.

खेळांमधील, कला क्षेत्रातील, चित्रपट सृष्टीतील काही असामान्य करीअरर्सवर नजर टाकली तर काही समान दुवे आपल्या लक्षात येतात.

■आपला कल-आवड ओळखून केलेली करीअरची निवड. ■चारचौघांसारखा मार्ग सोडून वेगळ्या वाटेने जाण्याची जोखीम. ■इतरांबरोबर तुलना न करता स्वतःसाठी निवडलेला वेगळा मार्ग. ■निवडलेल्या करीअरर्समध्ये अथक परिश्रम व सर्वोच्च कामगिरीचा ध्यास.■यशाबरोबर अपयशही पचवण्याची ताकद. ■शक्य तेवढ्या लवकर म्हणजे कमी वयातच केलेली करीअरची निवड. ■निवडलेल्या करीअरवर असामान्य निष्ठा व प्रेम. ■अपेक्षित यश मिळेपर्यंत वाट बघण्याची तयारी. ■आणि मिळालेलं यश टिकवून ठेवण्यासाठी, नवनवीन यशाची शिखरे पादाक्रांत करण्यासाठी पुन्हा पुन्हा मेहनत घेण्याची तयारी.

आजकाल मोठ्या शहरांमध्ये वेळोवेळी करीअर विषयीचं मार्गदर्शन कधी विनामूल्य तर कधी सशुल्क उपलब्ध करून दिलं जातं. या विषयावरची मौल्यवान पुस्तके उपलब्ध असतात. बऱ्याच वेबसाईटवर आपल्या उपयोगाची माहिती आपल्याला मिळू शकते. आपण मोबाईलसाठी किंवा इतर बाबींवर ज्याप्रमाणे हजारो रुपये खर्च करतो त्याबरोबर आपल्या जीवनाशी संबंधित करीअरच्या प्रश्नावर उत्तरे शोधण्यासाठीसुद्धा थोडा खर्च केला तर त्याने आपलं आयुष्य सुखी व समृद्ध होऊ शकतं.

असं म्हटलं जातं कि "शांततेत घाम गाळला तर युद्धात कमी रक्त सांडाव लागतं" करीअर विषयी जास्तीत जास्त जाणून घेतलं तर निर्णय घेणे सोपे होईल, नाही का? आणि करीअर विषयीच्या या माहितीमुळे मार्कांचा डोक्यावरील बागुल बुवा व ताणही दूर होण्यास मदत होईल!

महेंद्र जी. बैसाणे मो. 86523 40256 www.bharukaka.com